सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी -०२२-६८५९७४७५/४९२/४४२/४४३/४४७

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet:http/www.dtemaharashtra.gov.in

क्र.२/एनजीसी/निबंध स्पर्धा आयोजन-परिपत्रक/२०२६/DTEM-D2/48/2026-DESK 2

**परिपत्रक :**

**विषय : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करणेबाबत..**

संदर्भ: मा.मंत्री महोदय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.मंत्री को रोज.नावि.,/टिप्पणी/१७९/२०२६,दि.०९.०४.२०२६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल, २०२६ रोजी येणाऱ्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे, संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच राज्यातील सर्व तंत्रनिकेतन महाविद्यालय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र प्रशाला, द्विलक्षी अभ्यासक्रम असणारे विद्यालये, किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम असणारे विद्यालय यामधील सर्व विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने नागरिक व समाजातील महत्वाचे घटक यांचे मध्ये या स्पर्धेबाबत जनजागृती करून या स्पर्धेस भरघोस प्रतिसाद मिळेल आणि या स्पर्धा यशस्वी होतील यासाठी आवश्यक कार्यवाही करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

तरी या संचालनालयांतर्गत येणाऱ्या संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच इतर संबंधितांना कळविण्यात येते की, या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेमध्ये आपला उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून, या उपक्रमास भरघोस प्रतिसाद दयावा. निबंध स्पर्धेचे स्वरूप व तपशील सोबत जोडलेले आहे.

सोबत-संदर्भीय पत्र

Digitally signed by
VINOD MAHADEORAO MOHITKAR
Date: 10-04-2026 13:51:35

( डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत :

१. मा.मंत्री महोदय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य, दालन क्र.२०२, २रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव.
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या कार्यालयाच्या अखत्यारितील सर्व संस्थांना, आपले स्तरावरुन अग्रेषित करावे.
४. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

मा.क्र.मंत्री का उद्या.रोज.,नावि.,/टिप्पणी/ /२० दि.
179/2026

मंत्री

**मंत्री**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 09 APR 2026

**विषय: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करणे बाबत..**

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या निबंध स्पर्धेचे स्वरूप व तपशील सोबत स्वतंत्रपणे जोडलेला आहे.

तरी राज्यातील सर्व तंत्रनिकेतन महाविद्यालय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र प्रशाला, द्विलक्षी अभ्यासक्रम असणारे विद्यालये, किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम असणारे विद्यालय यामधील सर्व विद्यार्थी तसेच मोठ्या संखेने नागरिक व समाजातील महत्वाचे घटक यांचे मध्ये या स्पर्धेबाबत जनजागृती करून या स्पर्धेस भरघोस प्रतिसाद मिळेल आणि या स्पर्धा यशस्वी होतील यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

मंगल प्रभात लोढा
**( मंगल प्रभात लोढा )**

**प्रति,**
**संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**कार्यालय पत्ता :** दालन क्र. २०२, २रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
**दूरध्वनी क्र. :** ०२२-२२०२ ५३०८/२२०२ ४५९२, **ई-मेल :** *min.skills@maharashtra.gov.in*

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६ नियमावली

## विषय: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य

**स्पर्धेचे गट:**

- गट १ – ITI / डिप्लोमा / बायफोकल / MCVC विद्यार्थी (शब्दमर्यादा: ५०० ते ८०० शब्द)
- गट २ – पुरुष / महिला खुला गट (शब्दमर्यादा: ८०० ते १२०० शब्द)

📅 **कालावधी: दिनांक १४ ते २० एप्रिल २०२६**

📄 निबंध सादरीकरण: निबंध PDF (हस्तलिखित किंवा टंकलिखित) स्वरूपात सोबत दिलेल्या लिंक वर अपलोड करणे आवश्यक आहे.

https://forms.gle/RcFPhcUgY८X४P२NT८

🏆 **पारितोषिके: दोन्ही गटातून**

🥇 प्रथम – ₹ ३१,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

🥈 द्वितीय – ₹ २१,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

🥉 तृतीय – ₹ ११,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

निबंध मराठी भाषेत लिहिणे अनिवार्य असावा आहे.निबंध मूळ (Original) असावा, कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा व मजकूर शिष्ट आणि सुसंस्कृत असावा.

निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरूपात स्वीकारला जाईल; मात्र अंतिम सादरीकरण PDF स्वरूपातच करणे आवश्यक आहे. निबंध टाईप करून किंवा हस्तलिखित निबंध स्कॅन करून दिलेल्या लिंकवर अपलोड करावा.

स्पर्धकांनी खालील माहिती आवश्य भरावी: पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक, ITI/शाळा/महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता.

**स्पर्धेबद्दल अधिक महितीसाठी** 9152230193 **या व्हाट्सपअप नंबर वरती संपर्क करावा.**